**महाराष्ट्र शासन**

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.**

**दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:** cetcell@mahacet.org

क्रमांक : आस्था-१९२५/प्र.क्र.२९/पद भरती/सेवानिवृत्त कंत्राटी/जनसंपर्क तथा आस्थापना अधिकारी/231/२०२५ दिनांक : 15 JUL 2025

## जाहीर नोटीस

**प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यलयाचे काम करण्यासाठी** कार्यालयातील कामकाजाच्या अनुषंगाने जनसंपर्क अधिकारी संख्या (एक) व आस्थापना अधिकारी संख्या (एक) या पदाकरिता कंत्राटी पध्दतीने काम करण्यासाठी सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांमधून शासन विहित अटी-शर्तीनुसार विवक्षित कामासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद / पदाची संख्या | पात्रता |
|---|---|---|
| १) | जनसंपर्क अधिकारी संख्या (एक) | अर्ज करण्यासाठीचे निकष/पात्रता -<br>१) अर्ज करणारे अधिकारी शासन सेवेतून (गट-अ/गट-ब) राजपत्रित पदावरुन निवृत्त झालेले असावेत.<br>२) सहाव्या वेतन आयोगानुसार किमान ग्रेड वेतन ५००० किंवा सातव्या वेतन आयोगानुसार किमान वेतनस्तर एस-१८ असावा.<br>३) सेवानिवृत्त होताना किंवा झाल्यावर त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाही प्रलंबित नसावी.<br>४) जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>५) अर्जदारास मल्टीमिडीया (विविध प्रसार माध्यमे) क्षेत्रातील वृत्तपत्र किंवा जाहिरात किंवा प्रकाशने किंवा प्रदर्शने किंवा दृकश्राव्य किंवा सामाजिक प्रसार माध्यम येथील कामाचा अनुभव आणि जनसंपर्क कौशल्याची माहिती, वृत्त लिखाण, संपादन, संवाद आणि जनसंवाद यांची योग्य माहिती. छापील/इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांमध्ये जाहिरात तयार करणे तसेच बस, बेस्ट, रेल्वे इत्यादी ठिकाणी पत्रके, मोठे जाहिरात फलक यासारखी प्रसार माध्यमे आणि त्यांची प्रसिध्दी, प्रसिध्दी तंत्र, छपाई तंत्रज्ञानाची माहिती, मल्टीमिडीयाच्या कामाची माहिती असणे आवश्यक आहे.<br>६) व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षा व प्रवेश प्रक्रियेची माहिती असल्यास प्राधान्य. |
| २) | आस्थापना अधिकारी संख्या (एक) | १) अर्ज करणारे अधिकारी शासन सेवेतून (गट-अ/गट-ब) राजपत्रित पदावरुन निवृत्त झालेले असावेत.<br>२) सहाव्या वेतन आयोगानुसार किमान ग्रेड वेतन ४८०० किंवा सातव्या वेतन आयोगानुसार किमान वेतनस्तर एस-१५ असावा.<br>३) सेवानिवृत्त होताना किंवा झाल्यावर त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी/न्यायिक कार्यवाही प्रलंबित नसावी.<br>४) जाहिरातीच्या दिनांकास अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा अधिक नसावे.<br>५) आस्थापना विषयक बाबी हातळण्याचा अनुभव, पदभरती,वेतन निश्चिती, सेवा पुस्तिका अद्ययावत या कामांचा अनुभव |

अटी व शर्ती,-

१) इच्छूक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी **दिनांक २५ जुलै २०२५** पर्यंत सोबतच्या विहित नमुन्यात अर्ज (विवरणपत्रासह) सादर करावेत.

२) अर्जदारांनी अर्जासोबत, विहीत विवरणपत्रातील माहिती, स्वत: साक्षांकित करुन पाठविणे अनिवार्य आहे.

३) ऑनलाईन/प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे पात्र उमेदवाराची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा अंतिम अधिकार प्रवेश नियामक प्राधिकरणाचा राहील.

४) इतर अटी व शर्ती, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग दिनांक १० जून २०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

५) अधिक माहितीसाठी: ०२२-२२०१६१५३ /५७/५९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

६) जनसंपर्क अधिकारी या पदावरील नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व सुरुवातीला केवळ ११ महिन्याच्या कालावधीसाठी मर्यादित राहील.

७) उमेदवाराचे कामकाज कोणत्यावेळी असमाधानकारक आढळल्यास सदस्य सचिव यांच्या अनुमतीने एक महिन्याची पुर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येईल.

८) सदर पदासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्ती असल्याकारणाने शासन नियमानुसार पारिश्रामिक देय राहिल.

९) आवश्यक अर्हता धारण असणाऱ्या इच्छुक उमेदवाराने सदर पदाकरिता सोबतच्या नमुन्यात अर्ज सादर करावा.

१०) पात्र उमेदवाराने सदर पदाकरिता अर्ज **दिनांक २५ जुलै २०२५** पर्यंत cetcell@mahacet.org या ई-मेल द्वारे पाठवावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

११) प्राप्त झालेल्या अर्जांची आवश्यक ती पडताळणी करुन उमेदवारास मुलाखत घेण्यात येईल तसेच उमेदवारांना मुलाखतीकरीता कोणताही प्रवासभत्ता देय राहणार नाही.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
सदस्य सचिव
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई.

स्थळ : मुंबई.

## अर्जाचा नमुना

### सेवानिवृत्त राज्य शासकीय कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज.

अर्जदाराने अलीकडील काळातील स्वत :चे छायाचित्र येथे चिकटवावे

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराचे संपूर्ण नाव | : | ---------------------------------------------- |
| २) | जन्म दिनांक व वय | | ----/----/------ |
| ३) | सेवानिवृत्त दिनांक | | ----/----/------ |
| ४) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेले पद | | ---------------------------------------------- |
| ५) | सेवानिवृत्तीच्या वेळी धारण केलेल्या पदाचे ग्रेड वेतन सातव्या/ वेतन आयोगानुसार वेतनस्तर | | ---------------------------------------------- |
| ६) | सेवानिवृत्ती वेळेस कार्यरत असलेल्या विभागाचे नाव | | ---------------------------------------------- |
| ७) | संबंधित प्रशासकीय विभाग | | ---------------------------------------------- |
| ८) | अर्जदाराचा पत्ता | : | ---------------------------------------------- |
| ९) | भ्रमणध्वनी क्रमांक | : | ---------------------------------------------- |
| १०) | ईमेल | : | ---------------------------------------------- |
| ११) | सेवेत असताना शिक्षा झालेली आहे का | : | ----/----/------ |
| १२) | आवश्यक असलेली अर्हता अर्जदारास आहे काय? | : | होय / नाही |
| १३) | अनुभव | : | ---------------------------------------------- |

महाराष्ट्र अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियम) अधिनियम २०१५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या निव्वळ कंत्राटी तत्वावर **जनसंपर्क अधिकारी व आस्थापना अधिकारी** या पदाकरिता प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

**अर्जदाराची स्वाक्षरी**

सहपत्रे : सर्व आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे

(टिप : उपरोक्त नमूद माहिती आवश्यक असल्याने संपूर्ण माहिती सादर करणे अनिवार्य आहे.)